# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला
दिनांकः— ०४/०६/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | १) सौ. वनमाला कैलास वाघ, वय ३८ वर्ष, पद—तत्कालीन सरपंच, तथा प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला<br>२) श्री. कैलास डिगांबर वाघ (सरपंच पती) वय ४६ वर्ष, व्यवसाय— शेती, दोन्ही रा. चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला |
| ३. | घटना तारीख वेळ | दिनांक ०९.०४.२०२६ चे १३.०४ वा. ते १३.२६ वा. |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | तडजोडीअंती रू. २०,०००/— |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | निरंक |
| ६ | घटनास्थळ | मुख्य बस स्टॅण्डजवळ असलेल्या सदाबहार हॉटेल, अकोला ता.जि. अकोला |

थोडक्यात हकिगत :— यातील तक्रारदार हे अथांग बहुउद्देशीय संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला मध्ये सचिव या पदावर आहेत.सन २०२४—२५ मध्ये शासनाच्या १५ वित्त आयोग या योजनेअंतर्गत ग्राम पंचायत चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला येथील महिलांना तिन दिवसाचे शिवणकामाचे प्रशिक्षण देण्याबाबत 'अथांग बहुउद्देशि संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला या संस्थेस ग्रामपंचायत चिंचोली गणू यांचेकडुन कार्यरंभ आदेश मिळाला होता. सदर आदेशामध्ये नमुद प्रशिक्षण देण्याकरीता करण्यात आलेल्या खर्चाची तरतुद रू. ६६,७००/— करण्यात आली होती. त्यानुसार 'अथांग बहुउद्देशि संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला या संस्थेच्या वतीने ग्रामपंचायत चिंचोली गणू येथे दिनांक ०५.०६.२०२५ ते दिनांक ०७.०६.२०२५ या कालावधीत तिन दिवशीय शिवणकामाचे प्रशिक्षण आयोजीत करून महिलांना शिवणकामाबाबत प्रशिक्षण दिले होते. सदर प्रशिक्षाणाचे रू. ६६,७००/— चे देयक मिळणे करीता ग्रामपंचायत चिंचोली गणू येथे देयके सादर केली होती. सदर कामाचे देयक काढून देण्याचा मोबदला म्हणुन यातील आरोपी यांनी रू. ४६,०००/— लाच रकमेची मागणी केली. परंतु तक्रारदारास आरोपीने मागणी केलेली लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता ला.प्र.वि. अकोला घटकाकडे दिनांक ०९.०४.२०२५ रोजी तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०९.०४.२०२६ चे १३.०४ वा. ते १३.२६ वा. दरम्यान गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ यांची तक्रारदाराकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी मुख्य बस स्टॅण्डजवळ असलेल्या सदाबहार हॉटेल, अकोला ता.जि. अकोला येथे करण्यात आलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ, तत्कालीन सरपंच, तथा सध्या कार्यरत प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांनी तक्रारदाराकडे रू. ४६,०००/— लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रू. २०,०००/— लाच रकमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच श्री. कैलास डिगांबर वाघ (सरपंच पती) यांनी सदर लाच रकमेच्या व्यवहारामध्ये तडजोड करून सदर लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून गैरअर्जदार यांचेविरूध्द दिनांक ११.०४.२०२६ व दिनांक २३.०४.२०२६ रोजी सापळा रचण्यात आला. परंतु गैरअर्जदार यांना तक्रारदाराचे हालचालीवर संशय निर्माण झाल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही. त्यावरून नमुद दोन्ही आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन सिव्हील लाईन, जि. अकोला येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. बापू बांगर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९०११३२३४२६), मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९७६४२१०४८५), श्री. मिलिंदकुमार बहाकर, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. अकोला (९१५८८२२६७६) यांचे मार्गदर्शनात सापळा अधिकारी श्री. अतुल इंगोले, पोलीस निरीक्षक (८८८८७५७५५०), श्री. प्रविण वेरूळकर पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार दिगांबर जाधव, अमोल भांड, अविनाश पाचपोर, संदिप ताले, असलम शहा, गोपाल किरडे, महिला अंमलदार. अर्चना घोडेस्वार, भाग्यश्री काशिद, शालु हंबर्डे चालक सलिम खान, नफिस शेख सर्व ला.प्र.वि. अकोला यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

ऑफिस फोन नं. ०७२४—२४१५३७०, टोल फ्रि क्रमांक— १०६४
मोबाईल क्र. ९४०३८०१०६४

(अतुल गुणवंतराव इंगोले)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला